डेकॅथलॉन :

ट्रान्सरिअल (इन्फिनिट)

नलिनी शांताराम नाईक

श्रीधर तिळवे

नवता

नवता प्रकाशन क्रमांक ??

डेकॅथलॉन : ट्रान्सरिअल (इन्फिनिट)

१६-सी, बिल्डिंग क्र. ५३, तपोवन,
एनएनपी अप्पर, गोरेगाव (पूर्व), मुंबई.
shridhar.tilve1@gmail.com
संपर्क : ९८९२२२९७३०

पहिली आवृत्ती : **?????२०११**

प्रकाशन :
'नवता'
कीर्तिकुमार शिंदे
६०२, आदित्य अपार्टमेंट,
आशानगर, कांदिवली (पूर्व),
मुंबई- ४००१०१
संपर्क : ९६१९९२२१२६
ई-मेल : navataa.prakashan@gmail.com

मुखपृष्ठ :
संजय चोचे

अक्षर जुळणी-मांडणी :
?????

मुद्रण :
इंडिया प्रिंटिंग वर्क्स
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई- ४०००३१

मूल्य ??? रुपये

प्रिय भाऊ,
तुम्ही आता माझ्या आयुष्यात नाही
ही ट्रान्सरिअल वस्तुस्थिती.

बाप पोराला दोन वेळा कळतो,
एकदा जेव्हा तो स्वत: बाप होतो
आणि दुसऱ्यांदा जेव्हा बाप हे जग सोडून
अनंतात विलीन होतो.

गृहस्थाश्रम न स्वीकारल्याने पहिली वेळ
आलीच नाही.

आणि आता दुसरी वेळ आली
तर कळूनही फायदा नाही.

तुमच्या आठवणी फडफडतायत

तुम्हालाच पुन्हा.

• **श्रीधर तिळवे-नाईक**

मनोगत

१९८२ ते १९८७ हा माझ्या आयुष्यातला कवी म्हणून जडणघडणींच्या कालखंड! पहिल्या तीन नवता पचवत, चौथ्या नवतेकडे न्हेणारा! या कालखंडातील कविता प्रकाशित करण्याचे ठरविले तेव्हा त्यांचे आठ गट तयार होतात असे जाणवले. त्यातील एक गट मात्र एका वेगळ्याच महाकृतीचा (कांदबरीचा) भाग झाला. उर्वरीत सात गट पुढीलप्रमाणे होतायत...

१) डेकॅथलॉन : इन्ट्रो (हा डेकॅथलॉन नावाने प्रसिद्ध झाला)

२) डेकॅथलॉन : इनिशिअल (हा 'एका भारतीय विद्यार्थ्याचे उद्‌गार' या नावाने प्रकाशित झाला).

३) डेकॅथलॉन : रिअल (मायनस)

४) डेकॅथलॉन : सररिअल (प्लस)

५) डेकॅथलॉन : ट्रान्सरिअल (इन्फिनिट)

६) डेकॅथलॉन : नॉनकॅटॅगरीकल

७) डेकॅथलॉन : एलसेट्रा

याशिवाय 'डेकॅथलॉन : लोकल' हा या कालखंडातला गट माझ्या 'आत्मचरित्रातले काल्पनिक क्षण : टची, टचेबल ॲण्ड अनटचेबल' या महाकृतीचा भाग म्हणून प्रकाशित झाला. ('महा' याचा अर्थ आकाराने मो, कॅनव्हासने मोठा) 'डेकॅथलान : इनफिनीट'मध्ये मी त्या कवितांचा समावेश केलाय ज्या सर्वसाधारणपणे धर्म व अध्यात्म यांच्या आसपास वा यांच्यात घुटमळतायत. आशा आहे त्या चांगला फील देतील आणि अस्वस्थही करतील.

हा आणि माझे इतर संग्रह काढण्याची रिस्क नवता प्रकाशनाचे किर्तीकुमार शिंदे घेत आहेत ह्याबद्दल त्यांचे आभार. ह्या संग्रहाचे मुखपृष्ठ तयार केल्याबद्दल .... ह्यांचे व टाईपसेटिंग व प्रिंटिंग केल्याबद्दल .... ह्या सर्वांचे आभार!

• श्रीधर तिळवे-नाईक

अनुक्रमाणिका

टेररीझम

कवितेवरच्या कविता

तिच्या कविता

गावाकडील कविता

अनंताच्या कविता

टेररीझम

पंजाब

आज कुणीचं कसं मेलेलं नाही

वर्तमानपत्रं इतकी कोरी कशी?
आणि आकाशात रक्ताचा धूर कसा नाही?

हे पाणी इतके शुद्ध कसे?
त्याला खूनाचा वास येत कसा नाहीये?

आणि ही हवा
एकाही बॉम्बस्फोटाचा आवाज कसा पोहोचवत नाहीये?

कुणीच कुणाला गोळी घातलेली नाही काय?

माझ्या भोजनात मृत्यूचं मीठ कसं नाही?

की आज माझा नंबर आहे?

✦✦✦

गॅरण्टी

आज आहेस
उद्या नसशील

ही झोप डोळ्यातील
निश्चित आहे
हे काय कमी आहे?

ह्या निद्रानाश झालेल्या काळात?

✦✦✦

ईश्वर

ईश्वराला एक तर निद्रानाश झालाय
किंवा तो कायमचा झोपी तरी गेलाय

जर त्याचा निद्रानाश असेल झाला
तर त्याला झोप येईल
म्हणून काय करता येईल

जर त्याला कायमची झोप लागली असेल
तर त्याला जाग यावी म्हणून
काय करता येईल

ईश्वराबद्दल आपण काहीच करू शकत नाही
हीच तर ईश्वराबद्दलची खरी समस्या आहे

ईश्वर हे रहस्य आहे
जे जागं झालं काय
किंवा झोपी गेलं काय
काहीच फरक पडत नाही

कदाचित् म्हणूनच ईश्वर अमर आहे

✦✦✦

बातम्या

बातम्या खबर देतायत
जगात काय घडतंय त्याची

त्यांनाही माहीत नाही
हे जग कुठं चाललंय
आणि त्या
शेवटी कुठं पोहोचणार आहेत

✦✦✦

दहशतीनंतर

पोप जगाशी बोलले
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जगाशी बोलले
मी जगाशी बोललो

एक साप थरथरला
एक बॉम्ब पडला
आणि एक विष भिनलेली कविता
बेचिराख झालेली भाषा घेऊन
पृथ्वीच्या कानात चालायला लागली

आता पोप मुके आहेत
अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा गळा बसलाय
आणि मी माझी शांतता
पेट्रोल संपलेल्या गळ्यानिशी
कवितेच्या दिशेने ड्राईव्ह करतोय

मला जीभेपर्यंत पोहोचायचंय
भराभरा आडवे येणारे
लाल सिग्नल ओलांडून

✦✦✦

तहानलेला वाघ

तहानलेला वाघ
नदीच्या पाण्यात पाहतोय
तहानलेला वाघ

घाबरतोय
पाहतोय
घाबरतोय
पाहतोय

उडी मारेल तेव्हा तृप्त होईल

✦✦✦

डास

इराद्याचा ना पवित्रा
ना आवाज
फक्त माझ्या त्वचेचा
कावेबाज अंदाज

शिंगात शिगोशिग
भूकेची ड्रॅक्युलिक आग
करत माझ्या रक्ताचा निरंतर पाठलाग

मारावे न मारावे
माझ्या डोळ्यात
सहिष्णू ताण

ज्याला मरायचंय तो बुद्धिमान डास
माझ्यातील छुपा रुस्तम मारेकरी न पाहताच
माझ्या रक्तात
मला सावज समजून - बेभान

कोणत्याही क्षणी ओढेन मी
हातातील अहिंसेची पीन
आणि करेन
हॅण्डस्फोट

एक तर तो जळेल माझ्या हाताखाली
किंवा पळून जाईल टाकून
माझ्या रक्ताचा अर्धवट उष्ण घोट

मी विचार करतोय
शांत डोळ्यांनी शांत हातांनी शांत हत्येचा
आणि जो मरणारय तो
स्वत:च्या मृत्यूच्या हालचालीची थोडीही खबर न घेता
माझे रक्त पिण्यात मश्गूल

✦✦✦

दहशतीपासून लपवलं स्वत:ला

खूप बोलूनच लपवलं दहशतीपासून स्वत:ला

ओठ तर नेहमीच गेले पेट्रोल भरायला
आणि भाषेच्या पंपावर राहायला

आता तर दहशतीची अवस्था अशी की
पेट्रोल पंपही तिच्या डोळ्यांच्या छायेत

मौन पाळावं तर कपडे गळून नागडे होण्याची भिती

ही काळी पडत चाललेली सोरायसी त्वचा
लपवू तरी कशी

वाऱ्याचे पडदे वाजतायत
आणि खोलीत शांतता
माझा घुसमटून होणारा मृत्यू
टाईप करत बसलेली

टकटक टकटक

टकमक पाहणारी तिची
टकामका बोटे
कागद संपले
की थेट दहशतीच्या शवागारात
आपण नग्न
स्वत:चं लावारीस प्रेत दुरून पाहात

टाकून दिलेलं शेवटचं वस्त्र

✦✦✦

बळी

आलो तर काहीच नव्हतो घेऊन

भाषा तर तुम्हीच दिली
न मागता

त्या भाषेनेच माझा बळी घेतला
मला न सांगता

✦✦✦

टॉर्च

हातात टॉर्च घेऊन
कुणी हिंडतंय

त्याला मी दिसलोय
आणि तो मृत्यू पाहिल्यासारखा किंचाळतोय

त्याच्या हातातील हलणारा टॉर्च

मी पाहिलेला शेवटचा प्रकाश

✦✦✦

कवितेवरच्या कविता

कविता

कविता लिहिता लिहिता
कवी छोटा होत गेला
इतका की
शेवटी कवी कवितेच्या पोटात दिसायला लागला

कविता संपली
तेव्हा कवी नाहीसा झाला होता
दुसरी कविता लिहिण्यासाठी

✦✦✦

शब्द दगड झाले

हळूहळू हे शब्द दगड होतील

उन्हात स्पर्श करणाऱ्याला ते देतील चटका
पावसात त्यांच्यातून कदाचित फूल उगवेल

हळूहळू होईल त्यांची माती
आणि ते माझ्यासारखेच काहीतरी उगवण्याची वाट पाहत
स्वत:च्या मरणात
आख्खी पृथ्वी सेलिब्रेट करतील

✦✦✦

प्रलय

एक म्हातारा हातात कवितेची काठी घेऊन
जगाच्या अंताकडे चाललाय

एक शिक्षक पुस्तकात कविता ठेवून शिकवतोय
सूर्याच्या गतिचे वास्तविक नियम आणि काल्पनिक अपवाद

एक मुलगी व्याकरणाचं भांडं घासतिय
आणि तिच्या घासण्याच्या आवाजात कविता खरखर करतिय

एक कपल कवितेत बसून
रंकाळ्यावर एकमेकाचं चुंबन घेण्याचं धाडस करतंय
आणि लोक कवितेच्या डोळ्यानं त्याचं मनोमन कौतूक करत
त्यांचा सार्वजनिक निषेध करतायत

एक मूल कवितेची बाहुली हातात घेऊन दुडूदुडू धावतंय

आणि एक कवी
कविता स्फुरण्याची वाट पाहत
प्रलयात बसून आहे

✦✦✦

असणे

हिमालयावरील उंच शिखरावर
एक झाड आहे

झाडाच्या शेवटच्या टोकावर
एक पक्षी आहे

पक्ष्याच्या गळ्यात
एक गाणे आहे

त्या गाण्यात मी आहे

जो इथं बसून कविता लिहितोय

✦✦✦

आरसा

कवितेत जितकं न्याहाळता येतं स्वत:ला
तितकं कशातच न्याहाळता येत नाही म्हणून
कधीपासून स्वत:ला न्याहाळतोच आहे कवितेत

ही दुनियादारी आणून ठेवतीये तिचा व्यवहारी आरसा
कवितेत मला विचलीत करण्यासाठी

तरीही मी त्या आरशात दुनिया पाहत
कवितेतच न्याहाळतो आहे माझा 'स्व'
जिथून माझे सारे 'स्व'र सुरू होतात

आरसा मला पाहतोय
मी आरश्याला

कविता सुरू होईल तेव्हा आम्ही दोघेही तडकू
आणि कविता
आमच्या काचा फिरवत
एखाद्या लहान मुलासारखी
स्वत:तच रमून जाईल

तिचा उत्साह संपेल तेव्हा संपेल
निर्मितीचा उलथापालथा करणारा उत्सव
आणि कॅलिडोस्कोपमधला गडद अंधार
हलण्यासाठी कसलाही स्कोप न देता
आम्हा सगळ्यांचाच कब्जा घेईल

✦✦✦

काळ

काळ समजून घेण्याचे अनेक मार्ग असतात

सरते शेवटी सगळे
कवितेला येऊन मिळतात

आणि धोका खातात

✦✦✦

असहाय्यता

कवितेला कुठं धंद्याला बसायचं असतं?

पण शेवटी तिचाही नाईलाज असतो
तिला पोट असते
किंवा भूक सोसण्याची तयारी नसलेला बाप

केवळ बापाकडं पाहून रंडीखान्यात जाताना
मी तिला कैकदा पाहिलंय

✦✦✦

डोळे

डोळे जे फक्त पाहत होते मेकअप भोंदू
खायला शिकलेत आता आख्खं डोकं त्या आतला मेंदू

ओठ जे फक्त करत होते कीस
फर्लांगभर जीभ काढून टेस्ट करतायत चुंबनातील मिसिंग रस्ते
स्पर्शाचा एकेक पीस

नाक जे घेत होतं हवेकडून फक्त श्वासाचे बळ
साठवतंय सॅटेलाईटी ऑक्सिजनमध्ये आख्ख्या हवामानाचे एरीयल तळ

पाय जे फक्त चालत होते हुंगत वाटांचा मळ
समुद्रात पोहत श्वसन करतायत घेत सोडत ॲसिडीक जळ

आणि भाषा
जी
जाळत कवीचे शव
वाजवत त्याचे जिवंत अवयव
लिहीत होती फक्त कविताच
घुसळतीये
स्वत:च स्पॉन्सर केलेल्या स्मशानात
स्वत:चेच अनस्पॉन्सरेबल हात

✦✦✦

अंतर

'पर्वत' हा शब्द म्हणजे पर्वत नव्हे

'नदी' हा शब्द म्हणजे नदी नव्हे

'समुद्र' हा शब्द म्हणजे समुद्र नव्हे

मात्र कविता म्हणजे शेवटी हे शब्दच

तुमच्या माझ्यात
ह्या क्षणी
पर्वताइतके
नदीइतके
समुद्राइतके
अंतर आहे

✦✦✦

स्वातंत्र्य

कवितांतूनच कविता जन्मत असेल
तर कवितेला काय अर्थ?

केवळ मराठी भाषेकडून कंडिशण्ड झालोय
म्हणून मी मराठी कवी
स्पॅनिशकडून कंडिशण्ड झालो असतो
तर स्पॅनिशही झाली असतो

हा असा कंडिशनींचा क्रूस
मी कधीचा वाहतोय
आणि स्वातंत्र्य माझ्या क्रुसिफिकेशनची
वाट पाहत
मला त्याच्यात उतरून घ्यायला
सर्वत्र उत्सुक उभे!

✦✦✦

कवींचे शब्द

कवी शब्दांनी जाळतात जंगल
कवी ठेवतात तळहातावर शब्दांनी बनवलेला हिमालय जिवंत
कवी चालतात आयुष्यभर शब्दात
कवी शब्दातच होतात संत

कवी पाहतात शब्दातून जग
कवी न्याहाळतात स्वत:ला शब्दांनी
जोपासतात शब्दातूनच नाती
कवी शब्दांनी स्पर्शतात आकाशाला
कवी शब्दांनीच करतात आयुष्याची माती

कवी शब्दांचीच काढतात पिके
कवी अनुभवतात शब्दांचा दुष्काळ करतात शब्दांचीच भाकरी
कवींना भूक लागते शब्दातच
आणि कवी शब्दांनीच जेवून
ढेकर देतात वारकरी

कवी मरत नाहीत सहजासहजी
कवी मेल्यानंतरही ताप देतात शब्दांतून
कवींचे शव बर्फात जळते पेलत अंतिम धून
आणि जळतानाही स्मशानाच्या थंडीत
सर्वत्र पसरलेले असते
त्यांच्या काळजाचे शाब्दिक ऊन्ह

✦✦✦

कवी

ज्यांचे डोळे सूर्य हिरावून घेतो
आणि ज्यांना दिसतो फक्त प्रकाश ते 'बुद्ध' असतात

ज्यांचे नाक सत्तेचा रंधा मारला जाऊन ताठ राहते
आणि ज्या नाकाला खुर्चीचा वास
सदासर्वकाळ येतो
ते 'नेते' असतात

ज्यांचा कान मूका निसर्ग ऐकत त्याला वटवाघळासारखा लटकतो
ते 'वैज्ञानिक' असतात

आणि ह्या सगळ्यांतून वाहत
ज्यांच्या जिभेत अडखळून
इतिहास तोंडघशी पडून
आपले दात गमावतो
ते 'कवी' असतात

✦✦✦

इको

कविता माझा इको आहे
मात्र तिची घंटा शोधू नका

ती बिनघंटेची फायर ब्रिगेड आहे

✦✦✦

भुंगा

मी या फुलावरून गुणगुणत त्या फुलावर

मी भुंगा
आणि माझ्या पायात क्रॉसपॉलिनेशनच्या मुंग्या

एक वारूळ कॅरी आऊट करतोय मी पायात
आणि वाट पाहतोय
पाय मोकळा होण्याची

✦✦✦

परिणाम

जे दुबळे होते
त्यांनी कविता लिहिली

जे दुबळे होते
त्यांनी कविता वाचली

जे सबळ होते
त्यांनी कवितेकडे लक्ष दिले नाही
त्यांना कंटाळून कविता पुढे निघून गेली

कवितेने
कुठेच
काही फरक पडला नाही

कशातच

✦✦✦

इरादा

या जगण्याचा वेग
फक्त कविताच पकडू शकते

जे लावून बसलेत गद्याचे घोडा
त्यांचे घोडे कवितेच्या मागेच धावतील
आणि कविता जगणे गिळकृंत करताना
किंवा जगणे कवितेला गिळंकृत करताना
प्रकाशाच्या गतिचा जो कॉस्मिक शेषनाग तयार होईल
तो घोड्यांना पिळून पिळून
भाषेत वाळत घालेल

तुम्ही घोड्यांना वाळल्यानंतर इस्त्री करा
आणि त्यांचा शर्ट अंगावर चढवा

मी शेषनागावर स्वार होऊन
त्याच्या फडावरून आख्खी भाषाच नव्याने लिहीन म्हणतो

✦✦✦

आनंद

आयुष्यात छोटी छोटी सुखंही मिळाली नाहीत कधी
म्हणून जी दु:खं मोठी मिळाली
त्यांचाच उत्सव साजरा केला

अंगावर फुले पडली नाहीत
याची कधीच बाळगली नाही मी खंत
ज्या जखमा झाल्या त्या सुगंधी झाल्या
या विचारानेच उमलत राहिलो सर्वत्र

आता आयुष्य पुन्हा आलंय माझ्या दारी
त्याला माझी सालटी सोलायचीये
तर मी मला माझी सालटीखालची
कवितेची त्वचा पाहायला मिळणार
ह्यानेच आनंदित

✦✦✦

घडणे

मी शब्द लिहिला
'जन्म'
मग जन्म झाला

मी शब्द लिहिला
'अस्त'
मग अस्त झाला

मग मी काहीच लिहिले नाही
मग काहीच झाले नाही.

✦✦✦

तिच्या कविता

अथांग

वसंत तिच्या अंगावरून
एमसीसारखा गेला
आणि तिला फुले आली
दोन महासुंदर स्तनांची

मग तिने सोडले स्वत:च्या रक्तात तिचे दोन पाय
आणि त्वचा चमचमायला लागली पाण्यासारखी

शेवटी ती चालत शिरली ढगासारखी थेट माझ्या हवामानात
आणि एक वादळ घोंघावत राहिले
छत्री करून तिच्या डोक्यावर- माझ्या काळजावर

मग अचानक तडकली वीज तेव्हा
जळून गेले तिचे कपडे
आणि तिच्या अंगात भरलेला पाऊस
कोसळत राहिला
माझ्या सर्वांगावर चहूअंगाने

आता ती अंगाच्या ओसरलेल्या पुरात
उभी राहून सोडतीये
शब्दांच्या कागदी नावा

आणि मी त्या नावांसोबत थोडा थोडा बुडत
तिच्या अथांग त्वचेतून माझं डोकं वर काढतोय

✦✦✦

जगाला

जगाला करू दे कितीही कटकारस्थाने
मला तुझ्या बॉडीत
माझी बॉडी पार्क करू दे

जगाला आखू दे माझ्या हत्येचा प्लॅन
मला तुझ्या त्वचेत
हा आख्खा राजवाडा म्यान करू दे

जगाला शोधू दे माझ्या चितेची जागा
तुझ्या स्तनांच्या पागेत
मला माझा घोडा बांधू दे

जगाला ठरवू दे माझ्या अस्थीची विभागणी
मला तुझ्या काळीज कलशात
राख होऊ दे

✦✦✦

दळण

एक धबधबाच धावत येतोय त्वचेचा
रपारप कोसळतंय स्पर्शाचं पाणी
ओठावर आपटतायत ओठ औलदार
कीसची पडतायत तजेलदार नाणी

मांड्यावर आदळतायत मांड्यांचे सांड
छातीतून जळतायत गंधकाच्या वाती
नाभीवर नाभी कुस्कुरतीये कमळ
उत्कटतेची होतायत धारदार पाती

कोण कापतंय कोण कापलं जातंय
मृत्यूच्या घामात वाजतंय अनावर मीठ
शरीरभर फुलतायत गव्हाचे दाणे
जात्यातून बाहेर पडतंय शरीराचं पीठ

✦✦✦

तिच्या प्रेमात

मी प्रथम तिच्या प्रेमात पडलो तेव्हा
सूर्य भरून घेतलेले तिचे स्तन
मला दिवस पाजत होते
आणि तिच्या अंगावर कोसाप्रमाणे उगवलेली रात्र
माझ्या टाहोला धन्यवादाचे पत्र लिहीत होती

मी दुसऱ्यांदा तिच्या प्रेमात पडलो तेव्हा
तिच्या ओठावरची जास्वंदी माझ्या रक्तावर
सुगंधाची रांगोळी काढत होती
आणि तिच्या मादक मांड्याचं चीज चढं
माझ्या दोनबोटी मेणबत्ती पुढं
अलवारपणे वितळत होतं

मी शेवटी तिच्या प्रेमात पडलो तेव्हा
तिच्या हातांच्या स्पर्शातून झिरपत होती
एक केयरटेकर ऊब
आणि उमलायला लागलेली तिची दृष्टी
धाक दाखवत
मृत्यूचा सांड
नजरेने दाबत होती

अखेरचे प्रेम संपवून जाण्याची वेळ आली तेव्हा
तिने माझ्या खोलीतील घड्याळ उतरवून
संतापाने खाली फेकले
आणि मी शेवटचा श्वास घेतला तेव्हा
माझ्या कानात येत होता
घड्याळ रस्त्यावर आपटून फुटल्याचा आवाज
आणि तिचा तिपेडी हुंदका

✦✦✦

शिकार

एका पुरुषाची झाली शिकार
करताना मी तुझा तुझ्यात पाठलाग
स्वत:त झालो शोकाकूल तर वाहत आली
एका स्त्रीची आत्महत्या डोळ्यातून मागोमाग

आता निदान कविता तरी
स्त्रीसारखी पोहोचेल म्हणून पाहिली वाट
तर शब्द पुरुषासारखा
तिच्या वाटेत उभा ताठ

ना पुढं सरकतंय कोणी
ना मागं
एक स्तब्धता न काढता माग
जन्म देण्यास सांगोपांग
घेऊन उभी आग

आणि मृत्यू
वांग्यासारखा भाजण्यासाठी तिच्या पोटात

एक भरीत रीत
आणि नाकात
मसाले भरलेले
विपरीत श्वास

✦✦✦

जीवनग्रस्त शव

मी पावलोय माझ्यात मरण रचत सरण शब्दांचे वाचे
उचल माझे जीवनग्रस्त शव त्याचे दैव त्यावरील दवाचे साचे

तुझ्या गुलाबश्यामल ओठात फुलव भाग्यांकाचे दगडी तेजाब
कोमल संकेतांनी पाज तृष्णेची शराब राख नियतीचा उगवता आब

मृत्यूसंकेताचे अंकित संचित स्वयंचलित विश्वाचा पोकळ डोलारा
श्वास समजत होतो तो निघाला वारा पाणी समजत होतो तो झाला पारा

✦✦✦

सेक्रेटरी

मी बोलतोय
आणि ती लिहून घेतीये
शॉर्ट हॅण्डमध्ये

काही वेळानं मी जे बोललोय
ते माझ्याही डोळ्यांच्या हाती लागणार नाही
आणि ते समजून घेण्यासाठी
माझ्या डोळ्यांना
तिच्याकडं चालत जावं लागेल

झक मारत

✦✦✦

संगीत

समुद्रावरून उडत जाताना
मी कोरडाच होतो
माझे पंख निळे होते
आणि त्यांचे प्रतिबिंब समुद्रात स्पष्ट पडले होते

मी गायली हवेत
तिच्याच आठवणींची गाणी
पण ती ऐकायला तिचे ढग उपस्थित नव्हते

माझ्या पंखांना तिच्या तहानेचा तडा गेला
तेव्हा त्यांचा आवाज माझ्या कानात पोहोचला नाही

मी उडत होतो
आणि गात होतो

मी जेव्हा तिच्या आठवणीच्या शेवटच्या नोटवर पोहोचलो
तेव्हा उशीर झाला होता
आणि तिच्या बेटाच्या ज्या तुकड्यावर मी कोसळलो
त्याच्यावर फक्त बहिरेच राहात होते

✦✦✦

ती-भाषा

ती मला डोळ्यांनी पाहात नाही
शब्दांनीच पाहते

तिची जीभ आहे एक महावाक्य
हाडं नसलेलं

तिचे ओठ टेकतात माझ्यावर
माझ्याच पॉजसारखे

आणि ती चालते
तेव्हा शब्दांच्या दोन पायावरच चालत असते

आता ती उतरतीये एखाद्या कवितेसारखी माझ्यात
आणि ती उतरतीये या थरारातच
फडफडते आहे माझे काळीज
कागदासारखे

✦✦✦

नवरा गेल्यानंतरचा बर्थडे

डाव्या बाजूचा नवरा अनपेक्षित गारद
उजव्या बाजूस शिल्लक मूल दुःखाची गदगद

कपाळावरचं लाल नाणं अनपेक्षितपणे चलनातून रद्द
वाजतंय बद्द

ती उतरतीये आयुष्याच्या पांढऱ्या साडीतील
शहाण्णव कुळी पायऱ्या

माझ्या फुलांना प्रतिसाद नाही की
माझ्या हॅलोला उत्तराचा हॅण्डशेक

फक्त तिच्या मौनाची मेणबत्ती
माझ्या डोळ्यातील तिचा बर्थ डे केक कापत
बिल्डिंगबाहेर पडतीये

✦✦✦

दोन

तिच्या दोन डोळ्यांत आहेत दोन ढग
एक रिता
एक भरलेला

जो भरलेला आहे त्यातून
कोसळतोय पाऊस तिथं
जिथं आहेत तिचे दोन
पहाडासारखे भव्य स्तन

एक बंद
एक उघडा

जो उघडा आहे त्यातून
एक नदी वाहतीये खालून
जी कमरपात्रातून वाहत
गुप्त होतीये गुप्तांगात थेट तिथं
जिथं आहेत तिचे दोन समुद्र
एक शांत एक रुद्र

जो शांत आहे त्याला
पाहू शकते माझी दृष्टी
ज्याची वृष्टी
मला जाणवतीये
पण ज्याची मला करता येत नाहीये पुष्टी

तरीही मी त्याच्यात
मारतोय दोन उड्या जोरात
एक आंधळी एक पांगळी

जी आंधळी आहे ती घडवतीये सहर्ष
पाण्याचे करोडो नमकीन स्पर्श
जे करोडो बोटांनी घडवतायत माझ्यात जगबुडी
आणि नाहीशी करत जातायत माझी कुडी

मला दिसतंय मी नाहीसा होत चाललोय तिथून
जिथून ती चाललीये निघून

आणि मला प्रथमच जाणवतीये
तिच्या भरभक्कम मांड्यांची साय
आणि तिचे मजबूत पाय

जे पडतायत लॅण्डस्केपमधून

माझे डोळे तुडवत

बिनधास्त बाहेर
जणू हेर

✦✦✦

तटस्थ

ती पावसासारखी
बरस बरस बरसतीये
आणि मी छत्रीसारखा स्वत:ला अनफोल्ड करत
तिला वरचेवर झेलतोय
त्वचेच्या रेनकापडावर

मला तिच्यात व्हायचं नाही इनवॉल्व
आणि तिला माझ्यात पूर्ण डिझॉल्व व्हायचं आहे

ती विरघळतीये
आणि रितीही होतीये

काही वेळानं ती माझ्या त्वचेवर पूर्ण रिती होईल
आणि मला न्हाणीघरात आंघोळीसाठी ढकलून
स्वंयपाकघरात निघून जाईल

काही वेळानं मी आंघोळ करून
तिचा हा नको असलेला पाऊस
धुवून काढेन
आणि ती चहा पिऊन फ्रेश होत
पुन्हा बरसण्याची तयारी करायला लागेल

✦✦✦

बद्ध

माझे ओठ जे सॉलीड आहेत
वाहतायत कासवाच्या पावलांनी
तिच्या सशासारख्या भेदरलेल्या ओठावर

माझे शहामृगासारखे नाक
उठत स्वत:च्याच फुफ्फुसातील वाळूतून
तिच्या आयाळ फुटलेल्या सिंहस्थ केसाळ डोक्यात
श्वासाची चोच खुपसून
करतंय तिच्या मेंदूतील त्वचेला जागं आणि ताजं

हातांचे डायनॉसर्स दशबोटी पायांवर मारत उड्या
तिच्या कानाचे सूपदार हत्ती कुरवाळतायत
बत्ती गुल झाल्यासारखा
तिचा वटवाघळी डोळा येतोय
माझ्या चेहऱ्याच्या काळ्या पेंग्विनवर लटकायला

माझ्या नजरेचा आवाज ऐकत
घामाचे बगळे उडताहेत आमच्या त्वचेच्या पाण्यावरून
स्तनांच्या मगरींना एकमेकाच्या तोंडी देत

तिच्या जंगलाला मंगलवतंय
माझ्या दोन मांड्यातलं चंचल जंगल

तिच्या संभोगाच्या घोडीबरोबर
पळून चाललंय माझं ब्रह्मचर्याचं गाढव

ऑरगॅझमचं खेचर जन्म घेतंय
बेभान चढत शरिरातील चढ्या रात्रीत
विदाऊट लिफ्ट

सगळं कसं अनावरत जनावरत चाललंय
आणि माझी तृष्णा कापायला आलेला बुद्ध
निर्वाणाची कुऱ्हाड हताशपणे खांद्यावर टाकून
आवाज न करता
जंगलातून निघून चाललाय

✦✦✦

रातोरात

रातोरात
ब्लेड गंजून गेलं

रातोरात
माझी दाढी गळून गेली

रातोरात
माझा आरसा फुटून गेला

रातोरात
माझा चेहरा गायब झाला

रातोरात
हवेनं खिडकी उघडली

रातोरात
माझा श्वास हवेचा हात धरून पळून गेला

रातोरात
माझं लग्न झालं

रातोरात
मी जळून गेलो

✦✦✦

स्त्री

ही स्त्री आहे की पारा
हे अवयव आहेत की अभिनय
हे आकार आहेत की अलंकार

काहीतरी हातांना गवसतंय
आणि हात
पाण्यासारखे वाहत
चाललेत

✦✦✦

सुहागरात्री बायकोस उद्देशून एक स्वगत

जेव्हा पाळी आलीये
तेव्हा पाळी आलीये म्हणून सांग

रक्त विस्कटलेलं असताना
रक्त पणाला लावण्याइतपत
मी नाहीये मर्द का बच्चा

अंग दुखत असेल तर
अंग दुखतंय म्हणून सांग
सर्वांगानं मी भरून आलोय म्हणून
हाडे शिजवत मला देऊ नकोस देहभोजन

दोन दिवसांच्या उपवासाने खवकण्याइतका
मी नाही अद्याप संभोगोत्तम भुकेला

माझ्या देहाचा रेडिओ चोवीस तास गाणं मागतो
हे खरंय
पण याचा अर्थ
मी जेव्हा-तेव्हा बलात्कारी असतो असे नाही

ही इच्छेची दुधारी तलवार आहे

केवळ मी धार काढली म्हणून
तूही म्यान मोकळं केलं पाहिजे असं नाही

प्रामाणिक रहा
मोकळेपणाने स्पष्ट काय वाटतं ते सांग

मी कम्युनिकेशनमध्ये कच्चा आहे
संकेतशास्त्राची एबीसीडी मला अवगत नाही
तेव्हा जे काळजात आहे
ते थेट माझ्या काळजात ओत

मूड नसेल तर मूड नाही म्हणून सांग

सुहागरात्रीचं काय घेऊन बसलीयेस?
शिष्टाचार साजरा करण्यात कसलं आलंय सुख

एक आहे
पाठ करून झोपी नको जाऊस

माझ्या मिठीत
झोप ऑन कर
झोपेत माझी हो
आणि मग स्वप्नात कुठेही जा

✦✦✦

दिवाळी

एक लाल केप
एक काळा दगड

फटाक

क्षणभर स्फोट
अंगभर दिवाळी

✦✦✦

चन्द्रस्वगत

प्रत्येक अमावस्येला मी
संपूर्ण
तुझाच राहीन

उरलेल्या रात्री मी
थोड्या तुला
थोड्या जगाला देईन

आपल्या घरी मी
कलेकलेनं कमीजास्ती दिसेन

पोर्णिमेला मात्र माझी वाट नको पाहूस
ती संपूर्ण रात्र मी जगाचा असेन

✦✦✦

मुलं नसलेल्या घरात

मुलं नसलेल्या घरात चार डोळे अकाली थकलेले झुकलेलं
छत जमिनीत वाकलेले पोरकेपणाचे न पेलणारे ओझे बाळगून
तिची त्वचा अकारण वाळत चाललेली जणू पाणी उडत जावं काळाच्या गरमीत
त्याचे ओठ शिजलेले शब्दात स्पष्टीकरणाची वांझोटी आग पेटवून पेटवून

नको तितकी रिकामी जागा घरात न पसारा ना बाळबोध अस्ताव्यस्तपणा
नातेवाईकही आस्थेने चौकशी करत करत शेवटी नाहीसे झालेले
फक्त एक काटेकोर मोर प्रमाणशीरपणाचा प्रत्येक कोनात नाचणारा
घड्याळात दोन काटे काळाला अडखळून स्वत:च्या पायात मोडकळून पडलेले

ती बोलतीये आपल्या खाजगीपणावर आदळणार नाही माझी खाजगी बाब
याची काळजी घेत तोही मुलांचा उल्लेख येणार नाही याबाबत दक्ष दरबारी
तिचे वक्ष नीट तिचे अवयव नीट तरीही शरीरात काहीतरी बिनसलेले
नको तितकी कडक इस्त्री कपड्यांना तरी नजर ती मोडायला कुणी मूल हवं
म्हणून वाट पाहणारी

बोचणारा खेळण्यांचा अभाव नेलकटरसारखा माझ्या नजरेची नखं कापत
नवीन नवीन फर्निचरच्या नवीन नवीन लकबी नकोशा उत्साहात उलगडून
मग मध्येच कधीतरी. "मूलं नसली की बरंच असतं तुम्ही होत नाही अप्रामाणिक
मागे ठेवून जायला कोणी नसते गरजच संपते घेण्याची लोकांना सांभाळून

आपण हिंदू ना फार ओवरपॉप्युलेटेड घराचं गोकूळ करत देशाची करतो धर्मशाही
आपल्या सगळ्या भ्रष्टाचाराचं मूळ हे गोकूळ आहे" तोही अनपेक्षित तर्कात स्तब्ध
मग वांझोटी शांतता जणू नसलेल्या मुलांना वाहिलेली श्रद्धांजली आणि गप्प गप्प
घरातून निरोप देताना वाळवी लागलेला उंबरठा डोळ्यात सुईसारखे सलणारे दु:खी प्रारब्ध

✦✦✦

इस्टमनकलर

रंगपंचमीसारखा इस्टमनकलर नवरा

उडून गेला

उरली पांढरी शुभ्र साडी
आणि शिमगा

✦✦✦

बायका आणि दिलीप चित्रे

बायका अनेक बायका नेक करतायत फेक विक्री
कवी शेकवतोय आत्मानंदाच्या अभेद्य फिकरी

बायका देतायत कापून मान बंद पोकळ कान
कवी लावतोय त्यांच्या जीभेचा कात टाकत कवितेचं पान

बायका करतायत उघडमीट धीट अंगागांचे क्लोज क्लोजप
कवी डोळ्यांना लावत लेन्स लसणाचा करतोय सांकेतिक जप

बायका पिंजतायत रक्ताचा कापूस कॅन्सरच्या गाठी
कवी परंपरेत बसून उघडतोय ज्ञानेश्वरांची ताटी

बायका मरतायत देहातल्या देहात गुदमरून श्वास
कवी भोगतोय आदिशक्तीचे भाषिक भास

✦✦✦

गावाकडील कविता

प्रगती

आज माणसाने
बल्बमध्ये सूर्य उतरवलाय

उद्या माणूस
सूर्यात स्वत:ला उतरवेल

आणि मग सूर्यावरही चालू होईल
बिनमाणसांचा दिवस
आणि माणसं उतरलेली रात्र

✦✦✦

चंद्राचे केस

चंद्राचे केस पिकत चाललेत
तसतसा तो दिसतोय
अधिककाधिक धवल आणि तेजस्वी

त्याच्या आसपासचा अंधार
ही त्याच्या तारुण्याची त्याने जपलेली
दु:खद आठवण आहे

✦✦✦

ह्या दुष्काळात

कुणीतरी होऊन वेडं
नांगरतंय खेडं
ह्या दुष्काळात

कुणीतरी होऊन शहाणं
दाखवतंय नाणं
ह्या दुष्काळात

कुणीतरी होऊन सूर्य
देतंय तर्क
ह्या दुष्काळात

कुणीतरी होऊन प्रेषित
जोखतंय हारजीत
ह्या दुष्काळात

कुणीतरी होऊन तहान
टाकतंय मान
ह्या दुष्काळात

✦✦✦

गाय

ही पृथ्वी गायच होती

म्हणूनच जेव्हा पृथ्वीवर तेहतीस करोड जीव होते
तेव्हा तिच्या पोटात तेहतीस कोटी देव होते

आता देव अब्जावधी
आणि गाय मात्र एकच

आता कदाचित देवच गोहत्या करतील
आणि चंद्रावर तिचे मांस शिजवून
मंगळावर निवांत ढेकर देतील

✦✦✦

प्रश्न

मी झाडांना प्रश्न विचारले नाही
नाही विचारले प्रश्न मी फुलांना
मी शरीरांना प्रश्न विचारले नाही
नाही विचारले प्रश्न मी मुलांना

मी प्रश्न विचारला नाही कधी आकाशास
नाही विचारला प्रश्न मी कधी मातीला
मी प्रश्न विचारला नाही कधी हवेस
नाही विचारला प्रश्न मी कधी नदीला

मी फक्त पाहिले मी फक्त साहिले
मी शांत झालो मी शांत झालो
आणि जेव्हा वाजली शब्दात शांतता
कवितेच्या गळ्यात मौन मौन झालो

✦✦✦

निसर्गकवी

एक निसर्गकवी भेटतो मला
निसर्ग जणू ठेवून खिशात

त्याच्या मते कविता अमर होण्यासाठी
निसर्गावरच लिहावी

माणसाने बनवलेल्या गोष्टींची काय ग्यॅरन्टी?
आज आहेत
उद्या असणार नाहीत

हा सूर्य हा चंद्र हे आकाश ही जमीन हे पाणी
सगळं कसं चिरंजीव कवितेतही चिरंजीव
कवीही चिरंजीव

मी काहीच म्हणत नाही
पाहात राहतो फक्त त्याच्या मेंदूने
मरणाला घाबरून केलेला निसर्गाचा सत्यानाश

✦✦✦

फुलपाखरू : टायगर

माझं अंडच घातलं गेलंय ह्या जगात
मिल्कवीड झाडावर

मी अळी होतो तेव्हाच
घेत राहिलो
मिल्कवीडच्या पानापानांतून विष
आणि ते भिनवत भिनवतच वाढीला लागलो

आता ह्या जगात जगताना
मीच झालोय टायगर प्रजातीचं फुलपाखरू
जे दिसताना दिसतंय कलरफूल
पण जे कुणी खाल्लं तर पोट डचमळून काढेल

हे विषच आहे माझं संरक्षण
आणि हे रंग आहेत माझं सौंदर्य

कधीपासून मी ह्या जगात
अंगातलं विष नाहीशी करण्याची युक्ती शोधत
स्वत:चे रंग मिरवत
फुलाफुलांवरून उडतोच आहे

✦✦✦

फुलपाखरू : नबाब

हे कॉमन नबाब
बसलंय ह्या रानात
विष्ठेवर

त्याला फुलातील मधुरसाची ना आवड
ना निवड

ते बसलंय विष्ठेवर
अनभिषिक्त सम्राटासारखं

त्याला माझ्या कॉमन पावलांचा कॉमन आवाजही
ऐकू येत नाहीये

ते विष्ठेवर राज्य करण्यात मग्न आहे

✦✦✦

पाली

प्रथम त्या घराच्या भिंतीवर चढून
चुकचुकायला लागल्या

मग मनात शंकेच्या भिंतीवर

आता कवितेत भाषेच्या भिंतीवर चढून
त्या चुकचुकतायत
आणि मी मागं वळून त्यांना पाहेपर्यंत
त्या गायब होतायत

भिंतीवरील घड्याळ्याच्या मागे

जे मी कधीपासून हातावर बांधायचं म्हणतोय

✦✦✦

पक्षी

आकाशात फार छान दिसतात म्हणून
म्हणून मी त्यांना घरात आणले
तर पिंजऱ्यातही ते उडत राहिले

पिंजऱ्यात ते छान दिसतात म्हणून
मी त्यांना काळजात ठेवले
तर काळजातही ते उडत राहिले

माझ्या काळजात ते उडतात
हे जगाला कळावे म्हणून
मी त्यांना कवितेत ठेवले
पण ते कवितेत उडाले नाहीत

फक्त त्यांच्या फडफडण्याचा आवाज ऐकू यायला लागला
कालांतराने तोही थांबला

आणि हळूहळू
आकाश
घर
काळीज
त्याच्यात विझून गेले

✦✦✦

माझ्या थंड डोक्याचे रहस्य

पृथ्वी आईसकॅप घालून
सूर्याभोवती फिरतीये

माझं डोकं त्या कॅपमधून जन्मलंय

✦✦✦

विस्मरण

काल छत्री विसरून
घरी परतलो

आज पुन्हा नवी छत्री विसरून
घरी परतेन

पाऊस पडत नाही
तोवर हे विस्मरण अटळ आहे

✦✦✦

भूकबळी

फोटोंत सर्वत्र गुटगुटीत बाळे
नोटांत सर्वत्र गुटगुटीत गव्हर्नरची सही
वोटांत सर्वत्र गुटगुटीत मतदार
मोटोत सर्वत्र गुटगुटीत अधिकारी
कोटात सर्वत्र गुटगुटीत व्यापारी
कोर्टात सर्वत्र गुटगुटीत न्यायाधीश

जे भूकबळी आहेत ते सर्व
ह्याबाहेर आहेत

✦✦✦

पृथ्वी व समुद्र

पृथ्वी समुद्रावर मनापासून प्रेम करते
तरी पृथ्वी सर्वत्र सारखी डुबत नाही

कुठे केवळ पाय
कुठे केवळ कंबर
कुठे संपूर्ण डोक्यासकट
तर कुठे तळवासुद्धा नाही

मात्र तिला आपल्या प्रेमात बुडवण्याचा हट्ट
समुद्र सोडत नाही

म्हणूनच पृथ्वीला सर्वत्र मिळते त्याचे प्रेम
आणि आपणाला पाऊस

✦✦✦

कावळा

कावळा आलाय

कुणीतरी येणारंय
असा निरोप घेऊन

कावळा यजमान होऊन
माझ्या घरात पाहतोय वाट
जो येणार आहे त्याची

मी वाट पाहतोय
जो निरोप घेऊन आलाय
तो कधी जातोय ह्याची

माझं घर कावळ्यानं भरून गेलंय

जो येणाराय तो घरात रिकामी जागा नाही म्हणून
परत गेला तर!

✦✦✦

ओंजळ

मी ओंजळीत पाणी घेतलं
तर माझ्या हातात ते डबकं झालं

मग ते मी पुन्हा नदीत सोडलं

मला माहीत नाही
ते कुठं गेलं
फक्त ते सळसळत गेलं
एवढं नक्की

✦✦✦

रेल्वेसारखा आला

वसंत रेल्वेसारखा आला
आणि गेला

जे धैर्य एकवटून हवाई डब्यात शिरले
त्यांची फुले झाली

जे झाडांवरच भयाच्या प्लॅटफॉर्मवर रेंगाळले
ते नाहीसा होणारा वसंत पाहत
काही काळ खिळून राहिले

आणि मग
झाडावरून गळून गेले

✦✦✦

घोडे

घोडे आता फक्त सिनेमात दौडतात
किंवा रेसकोर्सवर
किंवा एखाद्या जाहिरातीत
किंवा एखाद्या फोटोत
किंवा हुसैनसारख्यांच्या चित्रात

घोडे कवितेत नाही दौडत

फक्त ते नाहीसे होत चाललेत
याची समदुःखी व्याकूळ नोंद दौडते

✦✦✦

मुक्त हायकू : एक

१ जर पाऊस आला तर
छत्री घेऊन येशील
पण उन्ह आलं तर
काय घेऊन येशील?

२ शेत तरारलंय

याही वर्षी
बाजारात जाईल

३ चिमणी झाली
कागदावर बसली
भुर्कन उडाली

कागदातून तिची चिवचिव ऐकू येतीये

४ लाकडी दरवाजा
लोखंडी कुलूप

माणसाने शेवटी
झाडे कडीकुलुपात ठेवलीच

५ लाकडी घरे जळाली
आतील माणसे पळाली
शेवटी झाडांचीच राख झाली

६ खूप खूप वर्षांपूर्वी
एक भूकंप आला
आणि ते सांगायला
मी उरलो

७ एक फूलपाखरू
गवतातून उडालं
माझ्यावर येऊन बसलं

आता माझ्या अंगभर गवत उगवतंय

✦✦✦

मुक्त हायकू : दोन

१ मी चंद्रावर पोहोचलोय
आणि इथेही मला तिचा चेहरा आठवतोय

२ मी चंद्रावर पोहोचलोय
तरीही मला लागलेले चंद्रग्रहण
सुटलेले नाही

३ कुणीतरी टाईप करतंय
स्वत:लाच
टाईपरायटरच्या आवाजात

४ मी स्वप्नाला लटकलोय
हे झोपेचे खिळे
असे ठोकलेले

५ कधीपासून झोपेत चालतोय
थकेन तेव्हा जागं व्हायला जिवंत नसेन

६ पाणी की आरसा
वाहतोय की गोठलोय
कधीच कळणार नाही

७ मी एकदाच अमावस्येत
चंद्राला रस्ता दाखवला
तेव्हापासून माझं बोट
कलेकलेनं वाढतंय

८ तुकारामाबरोबरच
त्याचा अभंग मेला

आता मी गातोय
त्यात विठ्ठल आहे

९ माझी स्मृती दगड झाली

तिचे तुकडे तुकडे करून
ते मी स्वत:वरच भिरकावले
तरी आवाज येत राहिला
लैला लैला

१० पृथ्वीच्या डोळ्यातून
नद्या वाहतायत

तिला माहीत नाही
तिचं दु:ख
संस्कृत्या फुलवतंय

११ समुद्रात शोधूनही जो सापडला नाही
तो समुद्र गिळणारा मासा मला माझ्यात सापडला

'सेल्फिश!'

१२ या थंड त्वचेखाली
इतकं गरम रक्त?

मी समोशीतोष्ण आसक्त

१३ हा वसंत काही अमर नाही
फुलून जा
आत्ताच

✦✦✦

अनंताच्या कविता

त्वचा

अभिनेत्याची त्वचा कधीच हाताला लागत नाही
तिच्यावर मेकअपचे थर चढलेले असतात

राजकारण्याची त्वचा पाण्यासारखी पातळ असते
ती कुठल्याही माणसाला घेऊन कधीही वाहू शकते

पोलिसाला त्वचा नसतेच
त्याला फक्त डोळेच असतात अंगभर
जे दुसऱ्यांच्या त्वचेवर रोखलेले असतात

अतिरेक्याची त्वचा टीकटीक करत असते
आणि तिच्याखाली काहीही असू शकते
आणि ही काहीही असण्याची शक्यताच दहशत असते

विक्रेत्याची त्वचा हवा बघून रूप बदलत असते
तिचा रंग समोरच्याच्या पैशावर अवलंबून असतो

क्रिकेटरची त्वचा पीचसारखी असते
जिच्यावर पडणारे चेंडू कमी-आधिक उडत राहतात वळत राहतात

कलावंताची त्वचा शाईसारखी असते
जी त्वचेच्या खाली खोलवर जाऊन अंतर्बाह्य न्याहाळत असते
स्वत:चं शरीर

परमेश्वराची त्वचा स्वर्गासारखी असते
तिच्यात स्वत: मेल्याशिवाय ती कुणालाच दिसत नाही

✦✦✦

बुद्धिबळ

ही इमेज आहे की सोंगटी
हे नातं आहे की बुद्धिबळ

कधी कोण स्वत:ला उंटासारखं तिरकं सरकवतोय
कोण घोड्यासारखं अडीच घर उडतोय
तर कोण हत्तीसारखं सरळसोट भासवतोय

प्रत्येक ठिकाणी मेंदू
स्वत:ऐवजी धाडतोय फक्त सोंगटी
आणि पाहतोय
स्वत:च्याच प्याद्याकडून झालेली स्वत:चीच कैद

एक पट मांडून बसलाय प्रत्येकजण
प्रतिमांचा
मॉडेल्सचा
सवयींचा

एक ब्लॅक ॲण्ड व्हाईटमध्ये आयुष्य चाललंय डे-नाईट
कलरफूल खेळ्या खेळत

खेळ्यामागून खेळ्या

स्पोर्टिंग स्पिरीट
आणि किलर इन्स्टिक्ट

घोड्यामागे एक घोडा त्या घोड्यामागे एक घोडा
हत्तीमागून हत्ती त्या हत्तीमागे एक हत्ती

एक केऑस आहे चालींचा
एक परस्परविरोध आहे सर्वंकष अराजकात

पट मिक्स होतायत एकमेकात
लढतायत एकमेकाशी
आणि मिठ्याही मारतायत

प्रत्येक मेंदू बळकावला गेलाय ह्या बुद्धिबळाकडून

आणि ईश्‍वर
खेळाच्या अंताची वाट पाहत
सर्वत्र ऑडियन्ससारखा
‘आहे’

✦✦✦

कंटाळा

समुद्रात बसून कंटाळा आला म्हणून
उभा राहिलो
पोटात ढग घेऊन

हाताने हवा लोटून
तयार केला मान्सूनी वारा

उधळली सर्वत्र पावसाची ओली गच्च नाणी

ओढीच्या ओढाळ ओढ्यातून वाहत
शेवटी पोहोचलो नदीचा गणपती घेऊन
समुद्राच्या तोंडात

पाहत राहिलो रिकाम्या हातांनी पाण्याचे विसर्जन

आणि स्वत:च्या मृत्यूचे सेलिब्रेशन करत समुद्रात
पुन्हा बसून राहिलो
कंटाळाच्या अंड्यात
पोटात ढग घेऊन

✦✦✦

चंद्रभागा

पंढरपूर दुरून पाहताना
चंद्रभागेचा मासा सुकलेला
भक्तीचे मीठ सर्वदूर
विठ्ठल टिकवणारे

मी अंगावर घेत खारट वारा
पाहतोय फक्त पळस
माझ्या त्वचेला तीन पानात वाटून

वाट्याला आलेली तीनफुटी
डोळ्यात भिजवतीये मंदिराचा कळस

माझ्या पायाखाली वाळवंटाचा सुरवंट
आणि आकाशात
फुलपाखरांचा उडत जाणारा गट

✦✦✦

सूर्य

सूर्य येतोय
एखादा आदिवासीसारखा
स्वत:च्याच तारांकित जंगलांना होत पारखा
चमकवत प्रकाशाचा मोती
माझ्या डोळ्यातील मोतीबिंदूंची राख करत
माझ्या अंगावरच्या सिमेंटात चरत

सूर्य येतोय
हुंगत माझ्या बेडवरील शहरी पांघरूण
जाळत काळोखाची कांबळ जून

सूर्य येतोय
नागवा आणि नागवला गेलेला
माझ्या मुखवट्यांचा फॉस्फरस पेटवत
माझ्या त्वचेखालचा रात्रीचा सुरवंट आटवत

सूर्य येतोय
मुक्त
मोकळा
आणि माझ्या देहाची झोपलेली बिल्डींग
ह्या शहरापासून
स्वतंत्र करतोय

✦✦✦

व्हिजुअल्स

ही माणसं चालताहेत माझ्या डोळ्यांत
ह्या कार्स धावतायत माझ्या डोळ्यांवरून
हे रस्ते उगवतायत माझ्या डोळ्यांतून
ही झाडं सळसळतायत माझ्या डोळ्यांपाशी

आणि हे माझे डोळे
लादलेले आंधळेपण सोसत
निमूटव्हिज्युअल्सना जन्म देतायत

✦✦✦

शहरातील माणसे

शहराला माणसाशी काहीच देणघेणं नसतं
माणसानांच वाटत राहत
ह्या शहराचं आपण काही देणंघेणं लागतो

माणसं घेत देत राहतात
श्वास उच्छवास शहराला
आणि हवापाण्याच्या गप्पा मारत मारत
शहराला उच्छवास देण्याची क्षमता संपली
की नाहीशी होतात
हवेतल्या हवेत

बिनशहरी

✦✦✦

पंचमहाभूतांची मक्तेदारी संपवत सहावं बोट

आकाशाची प्रकाशावरील मक्तेदारी संपली
जेव्हा मी गहन अंधारात लावला पहिला दिवा

मग जेव्हा मी शोधली वीज
तेव्हा भूमी आणि अग्नीची मक्तेदारीही संपली

कालांतराने जेव्हा मी बनवले सेल
तेव्हा पाण्याचीही मक्तेदारी संपुष्टात आली

आता औष्णिक वीजेनंतर हवाही रिटायर झालीये
आणि माझं होत चाललंय
पंचमहाभूतानंतरचं स्वतंत्र सहावं भूत

ह्या निसर्गाच्या हाताला लागलेलं सहावं अनवॉण्टेड बोट

जे कुठं कुठं उंगली करणारय
कुठं कुठं कसले कसले दिवे लावणारय
मलाच माहीत नाही
भर प्रकाशात

✦✦✦

गॅसवर आहे

सह्याद्री जो आपलं अंगुठाछाप आयुष्य
उमटवतोय टेक्स्टबुकात
गॅसवर आहे

विठ्ठल जो वाजवतोय काळात
अठ्ठावीस युगांची वीट
गॅसवर आहे

झाडांत एक शूट होतीये जाहिरात
'झाडे वाचवा झाडे लावा' मोहिमेची
आणि झाडं जी उत्सुकतेपोटी
शॉट देतायत
गॅसवर आहेत

वाघ जो बसलाय जाऊन
भोळसटपणे पर्यावरण खात्याच्या बंगल्यात
गॅसवर आहे

आणि ज्यांनी गॅस ठेवण्यासाठी
सिलींडर्ससाठी भल्या मोठ्या रांगा लावलेत
ते सगळे गॅसवर आहेत

✦✦✦

चक्रधर

ज्यांना पकडायचाच
त्यांना पकडू दे नुस्ताच पाय किंवा नुस्ताच कान

मला हवा आहे संपूर्ण हत्ती
ह्या जंगलातला

त्यासाठी हत्तीच्या पायाखाली तुडवला जाण्याची माझी तयारी
संपूर्ण आहे

माझे मरण
मी फाट्यावर मारतो

✦✦✦

सूर्य रुग्णासारखा माझ्या घरी येतोय

सूर्य
माझ्या घरी येतोय
रुग्णासारखा

त्याला वाटतंय तो मरणार आहे
आणि त्याला मरायचं नाहीये कधीच

तो कवींच्या आहारी जाऊन समजत होता स्वत:ला
प्रकाशाप्रमाणं अमर
आणि त्याला शास्त्रज्ञांनी सांगितलंय
की तो मरणार आहे ही त्यांची खबर
सायंटिफीक आहे

मी कवी आहे
आणि वैदिक ऋषींप्रमाणे मी त्याला द्यावा अमरत्वाचा दिलासा
म्हणून तो माझ्याकडे येतोय

त्याला झालाय अनाकलनीय डेथ कॉम्प्लेक्स
आणि त्याला द्यायला माझ्याकडे लाईफ व्हिटॅमिनच्या गोळ्याच नाहीत

त्याच्या त्वचेवरही आजकाल
दिसायला लागलेत मृत्यूचे डाग
आणि तोंडातील हेलीयमच्या दातांत पडायला लागलीये शुभ्र कीड

तो परेशान होऊन बसलाय
माझ्या समोरच! खुर्चीत!
आणि मी त्याच्या मृत्यूविषयी काहीतरी खरडतो आहे

त्याला वाटतंय
मी लिहितो आहे एखादं डॉक्टरी प्रिस्क्रिप्शन
ज्यावर लिहिलेल्या गोळ्या घेऊन तो बरा होणाराय
आणि मी डॉक्टरी अक्षरांप्रमाणे काहीतरी कागदावर गिचमिडत चाललोय

मी, लिहितोय त्याच्या बसलेल्या प्रकाशात त्याच्या मृत्यूविषयी कविता
आणि माझे लिखाण त्याच्या मृत्यूइतकेच अनाकलनीय होत चाललंय.

✦✦✦

प्रवास

ही रात्रीची बस
आणि शिगोशिंग अंधार

भैच्योद हजार वर्षे हा असाच

बापानं पाहिला
बापाच्या बापानं पाहिला

ही रात्रीची बस
अंधारातून
प्रवाशांना घेऊन
कुठं चाललीय कुणालाच माहीत नाही

प्रत्येकाला दिसतोये फक्त ड्रायव्हर त्याची पाठ
आणि प्रत्येकाला त्याचं दिसणंच पुरेसं आहे
रात्री प्रवास करताना

✦✦✦

कनेक्शन

मी कधीपासून आठवत नाही
सूर्याभोवती चक्कर टाकत
सूर्याशी बोलतोय
आणि सूर्य कधीपासून ते माहीत नाही
किरण पाठवत
माझ्याशी संवादतोय

कधीपासून ते आठवत नाही
पण गेली कित्येक वर्षे
हा फोन डिसकनेक्ट होईल
ह्या भयाने
मी पृथ्वीवरच उभा आहे

✦✦✦

लाईफगेम

आयुष्याच्या मैदानात उतरताना
मी कधीच उतरत नाही गेमप्लान घेऊन

मी उतरतो
अहंकाराच्या अनपेक्षित कलाटण्या
आणि त्याचे मायावी चकवे गृहीत धरून

मला आवडतात
रिॲलिटीच्या पाटा विकेटस
त्यावर अहंकाराने रचलेल्या आखीव रेखीव खेळ्या

तरीही आकांक्षेची बॅट घेऊन हातात
मी करत नाही बंधनाच्या बाजूने बॅटिंग
किंवा धर्माच्या स्टम्पस्मागे उभा राहून विकेटकिपिंग

मी होतो एक रिस्कटेकर बॉलर
जो स्वत:चीच विकेट काढण्यासाठी
न कंटाळता टाकत राहतो
सत्य शोधणारा तिखट चेंडू

निर्वाणाच्या दिशेने हवा स्पीन करत
रिॲलिटीच्या पाटा विकेटवर

✦✦✦

खिडक्या

खिडक्यातून फक्त खिडक्या दिसतायत
दारातून फक्त दारं

भिंतीतून फक्त भिंती दिसतायत
जमिनीतून फक्त जमीन

डोळ्यातून फक्त दिसतायत डोळे
जे खिडक्यातून फक्त खिडक्या पाहतायत
दारातून फक्त दारं

✦✦✦

ग्रहदशा

सूर्य उगवला

बुध वापरून
शुक्र रोमण्टीक झाला

चंद्रग्रहण लागले
पृथ्वी थरथरली

मंगळाने कंटाळून शुभमंगल म्हटले
गुरूनं आशीर्वाद दिला

आणि मग जो शनी मागे लागला
तो सुटलाच नाही.

✦✦✦

शोकांतिका

हा जाणारा प्रत्येक क्षण
प्लेबॅक देतोय
येणाऱ्या प्रत्येक क्षणाला

हा माझा वर्तमान
धून बदलून
नव्या आवाजात
जुनेच गीत गातोय

✦✦✦

कुरतड

ईश्वराला कुरतडून कुरतडून खाल्ला आयुष्यभर

शेवटी थकून मरणात झोपलो
तर स्वप्नात म्याँव असा आवाज झाला
आणि तो आवाज कुणाचा कुठून येतोय हे कळायच्या आत
मीच उंदरासारखा पळून आलो
ह्या जन्मात

ईश्वराला पुन्हा कुरतडून खाण्यासाठी

✦✦✦

वारसा संक्रमण

एक वाट मिळत नाही
म्हणून एक बीळ तयार करायचं

आणि मग त्यातून उगवणारे साप
जे उगवणार ह्याचा आधीच कयास असतो
डसायला लागले
की विष कितपत भिनलंय ह्याचा
स्वत:तच अदमास घ्यायचा

कालांतराने सवय पाडून घ्यायची सापाची इतकी की
तो डसला नाही की त्याच्या जागी डसून घ्यायची त्याची आठवण

मग तीही सवयीचीही झाली की आपणच घाबरत राहायचे
काल्पनिक दंशाना

पुढं तेही संक्रमित करायचे आपल्या वंशजांना
आणि ते बिळाच्या मूळाशी जाऊ नयेत म्हणून
त्यांच्या वाटांवरच मांडून ठेवायच्या पळवाटा

त्याही कमी पडल्या की मांडून ठेवायची फक्त त्यांची मॉडेल्स
आणि त्यांनी उभारलेल्या जगडव्याळ आर्किटेक्चरला
ट्रॅव्हलिंग व्हिझिटस् द्यायच्या
ज्यांना वाटांच्या मूळाशी कधीच जाऊ द्यायचं नाही

विमानातून असं हवेत उडताना

✦✦✦

तेव्हाच

जेव्हा स्वर्ग आणि नरक
होतील हवेतल्या हवेत नष्ट
तेव्हाच आपण स्पष्ट
पृथ्वीवर भेटू

✦✦✦

थोडक्यात

ज्याला आयुष्यात कायम सत्य बोलता येत नाही
जो अधूनमधून घाबरून
खोटं बोलतो
अशा माणसाने कविता लिहाव्यात का?

एक प्रश्न
आणि त्याच्या येणाऱ्या भाषिक लाटा

मी पुन्हा आहे तसाच
कधी खरा
कधी खोटा

थोडक्यात फालतू

या कवितेच्या कड्यावरून ढकलून द्या.

✦✦✦

आंधळे

सूर्य आंधळा आहे
आणि ते बरंच आहे

त्याला माहीत नाही
त्याचा प्रकाश कुणापर्यंत पोहोचतोय
आणि तो काय करतोय

लोक डोळस आहेत
आणि ते
प्रकाशाला स्वस्त समजतात

त्यांना दिसत नाही
ते सूर्यामुळेच डोळस आहेत
हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ सत्य

✦✦✦

लोणकढी थापेची

प्रथम मी एका अस्सल लोणकढी थापेची
कागदी पुडी सोडली

मग लोकांनी तिला तरंगताना पाहून
तिच्यावर विश्वास ठेवला

ती हळूहळू पाण्यावर मात करणाऱ्या फायबरसारखी
घट्ट झाली
आणि एखाद्या शीपसारखी स्वत:त सत्य असल्याचा थाटात
नांगर टाकून बसली

मला आता शंका आहे
माझाही आता तिच्या समुद्र पार करण्याचा क्षमतेवर
विश्वास बसत चाललाय

✦✦✦

पिंजरा

पक्ष्याला पिंजरा पकडत नाही
माणूस पकडतो

पक्षी पिंजऱ्यात कैद नसतो
माणसात असतो

कुलूप पिंजऱ्याला नसते
माणसाला असते

माणसाने स्वत:ची खिडकी खोलली
की पक्षी मुक्त होतो

आणि जो उडूनही माणसाकडेच परततो
तो पक्षी नसतो पिंजरा असतो

✦✦✦

केऑस

समोर संधी आहे
आणि मला ती घ्यावीशी वाटत नाही

हा आळस आहे
की मी निरस आहे

समोर पंचपक्वानाचं ताट मांडून माणूस निघून गेलाय
आणि मला आता कळतंय की
जे मला खायाचं होतं
ते हे नाही

एकंदरीतच सगळं कठीणच

भूक आहे
पण मला माझ्याच मूडप्रमाणं माझ्याच पद्धतीने
जेवायचंय

समोर ताटालाही कळत नाहीये
मी त्याला का खात नाही ते

भूक आत्महत्याही करत नाही
आणि मला ''हे ताट खा'' अशी स्पष्ट ऑर्डरही देत नाही

एक केऑस आहे पोटात
अन्न आणि भूक यांच्या दरम्यानचा

ताट वाजतंय अन्नात
आणि भूक त्या केऑसच्या ऱ्हिदम पकडत
ॲसिडीटीत नाच करतीये

✦✦✦

नित्शेसाठी

जिवंत असताना कुणी विचारलं नाही
म्हणून तो टप्प्याटप्प्याने मरण पावला

मेल्यानंतर त्यांच्या शवानं सर्वत्र पसरायला सुरुवात केली
आणि तो विख्यात झाला

आता जो तो त्याच्या प्रेतात उभा
त्याच्यावर बोलतोय

कदाचित त्याच्याआधी ईश्वरचंही असंच झालं असेल

✦✦✦

बोटीत

मी बोटीत बसलोय
आणि मला पोहता येत नाही

समुद्रही बघायचाय
आणि पोहायलाही शिकायचं नाहीये
अशा माणसांवर
लाटा भुंकतील नाही तर काय करतील

वारा वाहतोय
आणि माझ्या श्वासांना त्याच्यात
उगाचच कातिलाना हमला फील होतोय

ढग तर हातात पाणीच घेऊन बसलेत
आणि ते कधीही पावसाची दोरी सोडून
आमच्या बोटीचा गळा आवळतील
असं वाटतंय

बोट निघालीये
आणि मी एखाद्या लहान मुलाप्रमाणं
तिचं बोट पकडून
ह्या समुद्राच्या जत्रेत
माझ्या डोळ्यातील भयाची
उघडमीट करत चाललोय

✦✦✦

आळस

अंगभर झोपेची चादर ओढून पडून रहायचं

स्वप्नांना तोंड द्यायचं स्वत:लाच स्वप्नांच्या तोंडी देऊन
तुकडे तुकडे करायचे मेंदूत स्वत:चे
आणि कॅलिडोस्कोप फिरवत आळसात लवडूंन ते पाहात रहायचं

चालून आलेली प्रत्येक संधी
विसर्जित करायची आळसात
आळसाचा फडा काढून टक्क पाहत बसायचे

आळसाचे पडलेले पाय डू:ख धरून
आळसालाच समर्थनात नटवायचे
त्याच्या मुखवट्याची मिरवणूक काढायची
आळसात इतकं आकसायचं इतकं आकसायचं
की ढाकाच्या मलमलीसारखं स्वत:चं आयुष्य
कवितेच्या छोट्याशा पेटीत ठेवता येईल

आळसातच काळ घालवायचा वेळ घालवायची
आळसातच अवकाशाला सावकाश करायचं

आळसातच मृत्यूची वाट पाहायची
आणि तोही आळशी आणि ढ मुलासारखा वागायला लागला
की वाट पाहत राहायची
कधीतरी तो आळस सोडून
आपल्या शरीराच्या वहीकडे वळेल
आणि आपला अभ्यास करेल

तोपर्यंत अंगभर झोपेची चादर ओढून
ऐकत राहायची
आपल्याच शरीराची फडफडती पाने
आणि विचाराने आळसाच्या नावाने मोडलेली स्वत:चीच बोटे.

✦✦✦

मनातल्या मनांत

मनातल्या मनांत बलात्कार करताना
आपणही असतो तितकेच हलकट तितकेच नीच
आपणही समजत असतो बाईला वनडेचं पीच

आपणालाही ओपनर होण्याची तितकीच आच
आणि काचेचं भांडं आपण फोडलं त्याचा तितकाच दर्प
आपलाही सर्प तितकाच विखारी

राजा,
न्याहाळताना न्याहाळ तुझ्यातील हा सैतान तितकाच स्पष्ट
तितकाच नीट
संत न्याहाळायला व्हायला लागत नाही धीट
एक कवीकल्पनाही पुरते त्यासाठी फीट

तू तुझ्या पापाची आतील बाराखडीही मोठ्याने वाच

मोक्षाची शांतता येईल तेव्हा येईल

✦✦✦

हार्डरॉक नॉईज

का कुणास ठाऊक
पण हा हार्ड रॉक
मला आज बिलकूल आवडत नाहीये

असं वाटतंय की
हे संगीत संगीत नाहीच

हा आहे विश्वाच्या बिग बँगनंतरचा
शिल्लक उरलेला नॉईज
जो माणसाला टॅप करून
त्याला मूळापासून दूर नेतोय

मी कानात परमेश्वराचा कापूस घालतोय
आणि तरीही माझे पाय
माझ्याशी गद्दारी करत
नॉईज फॉलो करतायत

✦✦✦

आत्महत्या

कधीपासून तेही आठवत नाही

पण हा आत्महत्येचा समुद्र आदळतोच आहे माझ्यावर
कधी भरती
कधी ओहोटी
चंद्राप्रमाणे बदलतो आहे माझ्या काळजात त्याचे टाइमटेबल

त्याच्या पाण्यात कितीदा तरी बुडालेत माझे चंचल डोळे
कितीदा तरी सोडलेत त्वचांच्या अपयशी नावा

पण तरीही त्याला संपूर्ण पिऊन पाणी पाणी होण्याचं धाडस मला होत नाही
माझ्या घराच्या जबाबदाऱ्या
मला काठावरच थांबवतात
आणि मी किनाऱ्यावरूनच पाहत बसतो
दु:ख कायमचं नाहीसं करण्याची गॅरण्टी देणारं त्याचं आकर्षक रूप

सततचं फ्रस्टेशन
आणि सतत ये-जा करणाऱ्या खिन्नतेच्या गाड्या

ह्या समुद्रानंच बांधलीये माझ्यासाठी
एक वाळूची वेटींगरुम

त्याला खात्री आहे
मी कधीतरी त्यात बसून बसून कंटाळेन
आणि एक दिवस असह्य होऊन शांतपणे त्याच्यात उतरेन

तोवर आहेच त्याच्या लाटाचं संगीत
आणि परतण्यासाठी वाळूचं एक हक्काचं घर

✦✦✦

ईश्वर

ईश्वर म्हणाला,
''कवितेलाही सोडून ये''

माझा कवितेचा मोह सुटला नाही

ईश्वर मौन झाला
आणि कवितेतही उमटला नाही

✦✦✦

क्षणी भंपक

काहीही करावसं वाटत नाही

नुसतं बसून रहावं म्हटलं
तरी मेडीटेशनची नॅक माहीत नाही

नुसतीच अस्वस्थता आणि तळमळ

सगळं एका क्षणी भंपक
मित्र भंपक
नातेवाईक भंपक
वस्तू घर सगळं सगळ भंपक

उथळ जगण्याचा नुस्ता खळखळाट

चुळा भरून टाकत आपण

आपल्या महत्त्वाकांक्षा ठिसूळ
आपलं अध्यात्म बिनबुडाचं
आपलं सगळं विरोधाभासात

आपण नुसते पादतोय घेतलेले श्वास

✦✦✦

फूलपाखरू, हायकू आणि हत्ती

ही आयुष्याची चायनीज लिपी
महाकारी
बोजड
किती किचकिच किती गिचमीच

हिच्यात एका क्षणाचं फुलपाखरू उडायला
मिनिटं लागतात मग तासतासभर चालणारा
दीर्घ कवितेचा हत्ती कोण उडवणार?

हायकूच्या फुलपाखरालाच सावकाश चालू द्या हिच्यात
ते मुक्कामी पोहोचेपर्यंत हत्तीइतकेच शहाणे झालेले असेल.

✦✦✦

प्रत्येक बुद्ध

प्रत्येक बुद्ध प्रथम
माझ्यासारखाच होता

प्रत्येकजण माझ्यासारखा शेवटी
बुद्धच होणार आहे

मलाही हे बुद्धाप्रमाणं
खोलवर कळायला हवं

जेणेकरून
मी जाणार नाही पळून
बुद्ध होण्यापासून

✦✦✦

दरम्यान ऐका

जन्माला घेतले नऊ महिने नऊ दिवस
मरायला घेईन फक्त नऊ क्षण

उरलेला दरम्यान वेळ
मरणाला घाबरत गलेलठ्ठ
पुन्हा जन्मता येणार नाही
याची बाळगत खंत मठ्ठ

घड्याळाच्या काट्यासारख्या फिरत तट्ट
संजीवनीचा करत पाठलाग वट्ट

काढेन

ती सापडली तर होईन अजरामर
नाही सापडली तर तिच्या शोधाची जराजर्जर शोधयात्रा
कवितेत ठेवून जाईन

तोवर ऐका
मरणाची टकटक
जन्माची टिकटिक

माझ्या टकमक आवाजात

✦✦✦

पक्षी

पक्षी उडाला
बसला
माझ्या डोळ्यात

✦✦✦

झाड

तू प्रथम जन्माला घातलंस
मूळातून झाड
झाडातून पारंब्या
आणि पारंब्यातून आमचे लटके जीव

आम्ही सजीव
म्हणून शोधतोय कधीपासून
आमचे मूळ
मूळामागचा तू
तुझा हेतू

लटकतोय कधीचा एक सेतू

कधी काटा
कधी छापा
आपल्या दरम्यान ट्राफिक गच्च आणि बेसूर

प्रत्येक गाडी उलटून
मृत्यूखाली चकनाचूर

ना ड्रायव्हर्स ना ट्राफिक पोलिस
फक्त ऋतूंचे पडणारे सिग्नल ओलीस

झाड
कधी हिरवे कधी लाल कधी पिवळे
सगळ्या गाड्यांना फुलांसारखे उमलवत
कधी फुलपाखरू कधी बगळे

✦✦✦

पिणारे

पिणारे फक्त दारू पित नाहीत

रक्त पितात
मेंदू पितात
लिव्हर पितात
जीभ पितात

स्वत:ची रुबाबदार चाल पितात

आणि मग स्वत:च्या जीभेत अडखळत
स्वत:च्या रक्तात हलतडुलत
स्वत:च्या लिव्हरमधील आत्महत्या हलवत
स्वत:च्या मेंदूचा तळ शोधत
शहरभर वाकडी वाटचाल करत

रस्त्यातून आडवे तिडवे वाहत जातात

पिणारे इतके वाहत वाहवत जाऊनही
शेवटी कुठल्याच नदीला जाऊन मिळत नाहीत

आणि पिताना त्यांचे सर्वात मोठे दु:ख
हेच असते

✦✦✦

हद्द

प्रथम रांगत रांगत
घराचा उबंरठा

मग चालत चालत
शहराची वेस

मग पळत पळत
राष्ट्राची सीमा

आता उडत उडत जी पार करेन
ती असेल माझ्या आयुष्याची शेवटची हद्द

ती पार करेन
आणि परतणार नाही

✦✦✦

संत वसंत

एका आत्यंतिक तहानेवेळी मिळालेला पाण्याचा घोट
एका आत्यंतिक भुकेवेळी खाल्लेली भाकरी
एका आत्यंतिक वासनेच्या क्षणी सापडलेली त्वचा
एका आत्यंतिक क्षणी दिसलेले निरभ्र आकाश

एवढेच घेऊन जाईन शेवटच्या क्षणात

आणि शेवटचा पूर्ण उमलेन काळात
तेव्हा अंगभर फुललेला असेल
संत वसंत

✦✦✦

ब्रह्म

तू ब्रह्म आहेस
तूच समस्या

तू तुझा दिवा बन
'तू' नाहीसा करून

तू बडबड आहेस
तुझ्यातच चाललेली

तू पलायन आहेस
तुझ्यातच चाललेलं

तू तुझ्यातच असा तडफड
आणि सड

मरताना स्वत:चा वास घे
आणि शेवटचा श्वास सोड
असमाधानी उमलावात

✦✦✦

जो सूर्य मी पाहतोय

आता हा जो सूर्य मी पाहतोय
अस्ताला जाताना
तो शेवटचा सूर्य आहे

उद्या जो उगवेल
तो असेल
नवा सूर्य

आणि नवा मी

✦✦✦

वाटचाल

ज्यांनी ढग पायात घातले
ते आकाशात पोहोचले

ज्यांनी रस्ते पायात घातले
ते जमिनीवर चालत राहिले

ज्यांनी श्वास पायात घातले
ते हवेत वाहत राहिले

ज्यांनी अश्रू पायात घातले
ते समुद्रास जाऊन मिळाले

ज्यांनी किरण पायात घातले
ते सूर्यास जाऊन मिळाले

आणि ज्यांना घालायला काहीच नाही मिळाले
ते अनवाणी
आयुष्यभर
स्वत:च्या चपला शोधत
स्वत:तच चालत राहिले

✦✦✦

डोंगर

माती उडण्याच्या इच्छेने
डोंगर बनतीये

पाणी उडण्याच्या इच्छेने
ढग बनतंय

आग उडण्याच्या इच्छेने
पक्षी बनतीये

एक हवाच आहे
जी अनिच्छेने उडतीये
आणि सगळ्यांना उडवतीये

आणि आकाश
सगळ्यांच्या उड्या सामावून घेऊन

सर्वत्र बसून

✦✦✦

हेराक्लिटससाठी

सगळं वाहतंच आहे

जे पाणी पाहिलंस ते वाहून गेलं
ते आता पुन्हा दिसणार नाही

आता जे पाहतोयस
ते दुसरं पाणी
जो पाहतोय तोही पाहून गेलाय
तो आता पुन्हा पाहणार नाही

ते दुसरं पाणी पाहतोय
तो दुसराच आहे

तेव्हा नीट अवधान
एवरी फर्स्ट स्टेप इज द लास्ट स्टेप इन वॉटर

✦✦✦

एक

माझा एका ॲडमवर विश्वास नाही
अनेक ॲडम्सवर आहे

माझा एका ईव्हवर विश्वास नाही
अनेक ईव्हजवर आहे

माझा एक फळावर विश्वास नाही
अनेक फळांवर आहे

माझा एका सैतानावर विश्वास नाही
अनेक सैतानांवर आहे

माझा एका ईश्वरांवर विश्वास नाही
अनेक ईश्वरावर आहे

म्हणूनच मी सर्वांना ओवत बसलोय
सत्याच्या एका दोऱ्यानं

तो मात्र एक आहे
हा माझा विश्वास नाही
ओवताना होणारा साक्षात्कार आहे.

✦✦✦

मोदक

प्रत्येकजण तुला दाखवतोय
चिंतेचे मोदक

आणि तू तूझ्या फ्रॉईडीयन पोटात
सुखाची घंटी वाजवत
प्रत्येक भक्त रिचवतोयस

विसर्जनानंतर तुझे सुखकर्ते पोट नेहमीसारखेच फुटेल
आणि भक्त बाहेर पडतील
सुखरूप

✦✦✦

जे. कृष्णमूर्ती

तो माझे कपडे काढतो
मला घराबाहेर काढतो
उन्हात उभं करतो
सूर्य दाखवतो

आणि मी उन्हात जळून राख होईन
ह्या भयाने
सूर्यात नागडा कसा लोकांना दिसत असेन
ह्या विचाराने
घरात पळून येतो
कपडे घालतो
बल्ब लावतो
आणि वाचत बसतो

त्याने सूर्यावर दिलेला टॉक

✦✦✦

एक फूल तोडल्यानंतर

मी एक फूल तोडलंय
आणि तेव्हापासून पाहतोय
सूर्य थोडासा अस्वस्थ आहे

धरतीवर एक खराश उमटतीये
आणि समुद्राची एक निषेधलाट कंपतीये माझ्या रक्तावर

एक फुलपाखरू नाराज होऊन उडून गेलंच त्या झाडावरून
माझ्या डोळ्यासमोरून

सगळं अस्तित्व दुखावलं गेलंय
आणि माझा हात फुलांच्या खूनानं माखून
अस्वस्थ झालाय दस्तयेवस्कीसारखा

मला उमलण्याखेरीज पर्याय नाही

✦✦✦

तुझ्यात बुडत नाहीसं होताना

तुझ्यात बुडत बुडत होईन जेव्हा
मी कायमचा नाहीसा
तेव्हा कदाचित मला सोडून द्यावे लागेल कवितेचे बोट
ठेवावा लागेल काठावर माझ्या काळजाचा ससा

कदाचित मी माझ्या बापाला सांगेन स्पष्ट
त्याच्या आध्यात्मिक नसण्याचा मला त्रासच झाला

कदाचित अतोनात होताना कष्ट
मी माझ्या मित्रांनाही सांगेन की
मी तुमच्याशी बोललोय अनेकदा खोटं
मनोमन फस्त केलेत कैकदा
तुमच्या हत्यांच्या कटांची ताटं

मी माझ्या प्रेयसीला सांगेन की एकदा
एका ब्ल्यू फिल्मच्या वेळी मी तिला केलं होत इमॅजीन
चारजणांबरोबर
आणि त्याक्षणी निदान मला त्याची वाटली नव्हती लाज
किंवा माझ्या कल्पनेनं शोधला नव्हता खोडरबर

मी सांगेन सरकारला की
अनेक राजकीय पुढाऱ्यांचे मी मनातल्या मनात साकारले खून
आणि अनेक अधिकाऱ्यांची लिंगे कापून
मी त्यांना ठार मारलंय बेडरुममध्ये उकळून

तुझ्यात बुडत बुडत मी होईन जेव्हा
अखेरचा आणि कायमचा तुझ्यात नाहीसा
तेव्हा मी असेन कदाचित
पाण्याहून पातळ
आईपेक्षा मायाळू
चंद्राहून शीतळ
आणि अधिकाधिक होत जाईल सरळ
माझा तुझ्यावर आणि तुझ्या बुडवण्यावर असलेला विश्वास

मी जेव्हा घेईन शेवटचा श्वास आणि अदमास तेव्हा कदाचित

माझे फुप्फुस असेल तुझ्याइतकेच तरल
आणि माझ्या
बुडण्याच्या आवाजात भरून राहील
माझ्या गळ्यातील तुझ्याच तहानेचा आवाज
आणि तिचा शेवटचा आचका

✦✦✦

कांदा

हा इमेजचा पापुद्रा
सगळंच भिंतीसारखं करतोय

जे जसं आहे
ते तसं दिसत नाही
जे दिसतंय
ते तसं नाही
हेही कळत नाही

हा इमेजचा प्रत्येक पापुद्रा
इमॅजीन करतोय एक कांदा
बांधेसूद वांदा
आणि केंद्र फुलवतोय

हा कांदा
जो सोलतोय स्वत:च नाकाने केंद्र
इमॅजीन करतोय
कांदा आणि त्याचे पापुद्रे

हे कांद्याचं इमॅजिनेशन
जे भिंतीसारखं चालत जातं सर्वत्र
सोलतंय
स्वत:च निर्माण केलेला कांदा
स्वत:च्याच पापुद्री नाकानं
आणि ह्या क्षणी ही कविता लिहितंय

✦✦✦

औदुंबर

ईश्वरावर पहारा देत बसलाय माझ्यातच एक मूर्ख
जो स्वत:ला समजतो महाबुद्धिमान

ज्याच्या तर्काची तहान
काल्पनिक पायऱ्या चढत
गाठते ढगांची मान
आणि पाताळात उतरताना शोधते
भूमिगत पायातील वहाण

ईश्वर आणि मूर्ख
एकाच नदीतून पावतात उगम
आणि तरीही मूर्ख बळकावून बसलाय
समग्र पाणी

त्याला वाटतंय की
ह्या पाण्यातून तो निर्माण करू शकेल
आख्खी नदी

औदुबंरासारखा पाय सोडून बसलेला तो
त्याला कळत नाही
औदुंबर हाही एक प्रॉब्लेमच आहे
बळकावलेल्या पाण्याने जन्माला घातलेला

तो लिहितोय
औदुंबरावर बसून औदुंबरावर कविता
आणि औदुंबराच्या मूळात
अधिकच मूर्ख होतोय

ईश्वर
ज्याच्याविषयी मूर्खाला फक्त कल्पना आहे
माझ्यात काय करतोय
हे कळत नाहीये

मूर्ख मात्र आत्ताही ह्या क्षणी मूर्खावर कविता लिहितोय

✦✦✦

काल्पनिकता

जो मूळातच काल्पनिक आहे
त्याला मी दिलीये एक भरभक्कम वीट
आणि तोही स्वत:च्या अस्तित्वाबाबत खात्री पटून
तिच्यावर भरभक्कम उभा आहे

त्यांन मागितलीये एक सुंदर खुबसूरत पत्नी
आणि माझ्या बायकोने स्वत: प्रेग्नंट राहून
त्याला जावई करून घेतलंय

त्याचा रुबाब वाढतोच आहे माझ्या घरात
आणि सगळं घर
त्याच्या भक्तीत व्यस्त आहे

तो अस्तित्वात नसताना हत्तीसारखा झोकात चाललाय
आणि आंधळेही त्याचे नसलेलं अवयव चाचपत
त्याचा आकार ठरवतायत

त्याचं असणं कवितेइतकंच अद्‌भूत आहे
आणि तो नुकतीच ‘पोएट इज डेड’
अशी घोषणा करून निघून गेलाय

त्याला मला मारायचंय
आणि मी स्वत:ला वाचवण्यासाठी
आजूबाजूला पाहतोय
तर तो अस्तित्वातच नाही

त्याच्याविषयीच्या अफवा आदळतायत माझ्या त्वचेवर
आणि तो मी अस्तित्वात नसल्यासारखाच
सर्वांच्याकडून त्याचं आत्मचरित्र लिहून घेतोय

मी कुणालाच दिसत नाहीये आताशा
आणि तो ‘बाप दाखवेन नाहीतर श्राद्ध घालेन’ म्हणत
माझ्या श्राद्धाची तयारी करतोय

✦✦✦

विचारच माझा घात करतो

हा विचारच माझा घात करतो

हाच खुपसतो बॉडीच्या शहाणपणात बुद्धिमान खंजीर
हाच पुरवतो भावनेला पंचवार्षिक फायद्याच्या योजना
हाच देतो बॉडीबाहेरील फंक्शनल हार्मनीला अहंकाराचा छेद
हाच बनवतो माझी कविता विचारी आणि मूर्ख

हा जो पुरवणी म्हणून जन्मला
करतो माझ्या मूळ संहितेची हत्या

हाच मांडतो आयुष्याची अनुक्रमाणिका आणि प्रिफरन्सेस
हाच पचका करून टाकतो माझा आताच्या तातडीचा

त्याचा आळस हीच माझ्या बॉडीची डोकेदुखी
त्याचा दूरदर्शीपणा हाच माझा दुर्दैवाचा दशावतार

त्याच्या चपलेच्या आवाजातच
चालत आहेत माझे पाय कैक शतके
आणि तो मला भटकवत
भागवून घेतोय त्याची वर्ल्ड टूरची जागतिक भूक

त्याचा नकाशा कधीपासून ठोकतोच आहे
माझा अंगात खिळे
आणि मी
तो मला भटकण्यापासून मुक्त करेल
ह्याची मुर्खासारखी वाट पाहतोय
माझ्या पायात

माझे पाय आणि जमीन ह्यांच्या दरम्यान
फक्त त्याची चप्पल आहे

मला हे कळतंय
पण पावलात वळत नाहीये

✦✦✦

भिकारी

एक भिकारी मागतोय भीक
आणि रात्रभर जागतोय
चोरी होऊ नये म्हणून

त्याच्याजवळ काय आहे
कुणालाच माहीत नाही

त्यालाही.

✦✦✦

होईन

वाढत चाललेत अंगावरचे काळे डाग

होईन हळूहळू एक पूर्ण अमावस्या
आणि उरात आत्मबोधाचा सूर्य उमलेल तेव्हा
कुणालाही पौर्णिमा न दाखवता
आतल्या आत स्वयंप्रकाशित
कायमचा गायब होईन

✦✦✦

खरा मर्द

आत्मचिंतेत जळण्यापेक्षा
आत्मचितेत जळ

स्वत:ची राख फासून जगशील
तर खरा जगशील

खरा मर्द
आत मरतो

✦✦✦

थेट पाहता आलं पाहिजे

आत थेट पाहता आलं पाहिजे
अहंकाराच्या भिंतीतून

ही कंडिशनिंगची भिंत नीट चालवता आली पाहिजे
ह्या तृष्णेच्या वाघावर नीट आरूढ होता आलं पाहिजे

हा मेंदू जो जुनाट झालाय
नीट मळून
पुन्हा नवा करता आला पाहिजे

मुख्य म्हणजे ही जी नुस्ती बडबड चाललीये
ती जिभेत म्यान करून
कायमची मौनात ठेवता आली पाहिजे

एकदा भाषेशिवायचं
सगळं जग नीट पाहता आलं पाहिजे

✦✦✦

शेले

सुतावरून स्वर्ग कधीच गाठता आला नाही
आणि सुताला कधी सोडताही आलं नाही

शेवटपर्यंत हा आयुष्याचा चरखा फिरवत राहिलो
आणि निघालेल्या सुतावरून नरकात पोहोचलो

आता नरकात
कापूस पिंजायचं काम दिलंय म्हणून
हा कापूस पिंजता पिंजता भाषा पिंजतोय
तर त्यातून कबीराचे शेले बाहेर पडतायत

हे सगळं मोक्ष मिळाल्यामुळे घडतंय
की कवी झाल्यामुळं घडतंय
हे मात्र काही केल्या कळत नाहीये

✦✦✦

पाणी

जेव्हा सर्वच पाणी असतं
तेव्हा ना कुणी घोडा
ना कुणी स्वार

तू आहेस पाण्यात भटकणारी लाट
जी कुठेही असू शकते
केव्हाही
आणि जिच्यातील पाणी सतत बदलणारे

फक्त वाहत जा
वर्चस्व गाजवण्याचा
आणि वर्चस्व गाजवून घेण्याच्या वृत्ती न्याहाळत

हा समुद्र अनंत आहे
आणि हातापायांना फक्त वीस बोटे

ती आयुष्याच्या नावाने मोडण्यापेक्षा
त्यांच्या सहाय्याने
हा समुद्र वाजव

कुठल्याही लाटेत तो संपूर्ण वाजतो

✦✦✦

लिखाण

जो लिखाण करतोय तो मीच आहे
जे लिखाण आहे तेही मीच आहे
जो वाचतोय तोही मीच आहे

मीच आहे सर्वत्र
आणि मीच आहे विभागणारा

हे सगळं एकसंध आहे
आणि ठिसूळ

जे लिहिलं जातंय ते वाचत

✦✦✦

चोर आणि पोलिस

एक चोर उभा आहे
पोलिसाचा वेष घालून
स्वत:ला पकडण्यासाठी

त्याला माहीत नाही
ज्याला पकडायचं आहे तो
‘तो’ स्वत:च आहे

तो स्वत:च चोर आहे
ज्याला माहीत नाही
त्याच्या अंगावर वेषच फक्त पोलिसाचा आहे

त्याला वाटतंय
तो जेन्युईन पोलिस आहे
आणि ज्याला पकडायचंय तो चोर आहे
जो तो स्वत: नाही

तो उभा आहे
आणि नेहमीप्रमाणेच त्याला अधूनमधून
ड्युटीवर डुलक्या येतायत

✦✦✦

माकडं

मी माकडापासून निघालेलो नाही
मी माकडच आहे

डार्विनला जे सुचलं ते माकडं पाहून सुचलं असेल
पण जे स्फुरलं
ते माझ्याकडं पाहून स्फुरलं

मी तेव्हा त्याच्या आत होतो
म्हणून खात्रीपूर्वक सांगतोय

✦✦✦

कापूस गाठी आणि केऑस

बाहेरील गाठी सुटल्या नाहीत
म्हणून आतील गाठी वळत राहिलो
तर त्याही तितक्याच केऑटिक
आणि डिसऑर्डरड

शेवटी सुटेनात म्हणून सोडून पळालो
आणि वळत बसलो ईश्वर
तर तोही तितकाच कनफ्युज आणि माझ्यासारखाच गाठीगाठीत भांबावलेला

त्याला मृत म्हणून घोषित केले
तर गाठी फेसाळून वर आलेल्या
आत बाहेर आणि त्यापलीकडेही

आता सर्वत्र एकच कापूस आहे हे उमगून चुकलंय
आणि स्वत:ला वातीसारखी पेटवण्याची वेळ येऊन ठेपलीये हेही

मीच होईन आता संपूर्ण प्रकाश
आणि उजेड पडेल तेव्हा
कापसासकट संपूर्ण ‘मी’ जळून गेलेला असेल

✦✦✦

मी आणि तू

तुझ्यापर्यंत पोहोचेन तेव्हा
मी मी नसेन
मी तूच असेन

तुझ्याच पापण्यांखाली असेल माझा डोळा
तुझ्यात नाकात असेल माझा श्वास

आणि
तू मला घेऊन चालायला लागशील तेव्हा
तुझ्या पदरवात होत राहील
माझ्याच पाचोळ्याचा आवाज

✦✦✦

सूर्य, कपडे आणि मी

सूर्यच समुद्र गरम करतो
पाठवतो ढग
पाऊस पाठवतो

सूर्यच न्हाणीत माझे त्या पाण्याने कपडे धुतो
सूर्यच त्याच्या उन्हात कपडे वाळवतो

सूर्य जो स्वत: नग्न आहे
माझ्या कपड्यांची इतकी काळजी घेतो

आणि मी
सूर्याने पाठवलेल्या पाऊसापासून
उन्हापासून
स्वत:चा बचाव व्हावा म्हणून
ते कपडे घालतो

✦✦✦

हिमालय

हिमालय माझ्या शेजारी राहायला आला
तर माझ्या गल्लीत बर्फ पडेल

मी हिमालयावर राहायला गेलो तर
हिमालयात बर्फ पडेल

मी गल्लीत आहे तसाच राहिलो
तरी हिमालयावर बर्फ पडेल

बर्फ हिमालयावर अवलंबून आहे
माझ्यावर नाही

हिमालय नसेन तेव्हा काय करेन?
मी जास्तीत जास्त एक कुल्फी विकत घेईन
'हिमालय' म्हणून चोखेन
आणि एका कुल्फीत हिमालय चोखण्याची युक्ती
माझ्या कवितेत ओतेन

✦✦✦

केऑसवादन

जेव्हा सर्वच वादक नाहीसे होतील
उरतील केवळ वाद्ये
तेव्हाच वाजेल हा ऑर्केस्ट्रा
एका असाधारण हार्मनीत

तोवर हा केऑस ऐक

ज्यात वाजवतायत
तुझेही हात

✦✦✦

शब्द

तो प्रथम शब्दानं भारला गेला मग भरला गेला
आणि शब्दावर विश्वास ठेवून
म्हणाला
''बंगला''

शब्दांनी 'बंगला' दारात पोहोचवला

मग म्हणाला
''रेडिओ''

शब्दांनी 'रेडिओ' बंगल्यात पोहोचवला

मग तो काहीतरी म्हणत राहिला
शब्दही काहीतरी पोहचवत राहिले

जेव्हा जगातल्या सर्व वस्तू संपल्या
तेव्हा तो म्हणाला
'सत्य'

आणि साऱ्या वस्तू शब्दासकट गायब होऊ लागल्या

तो मग शब्दहीन शांततेला इतका घाबरला
की जोराने किंचाळला
'शब्द'

आणि पुन्हा शब्दांत दाखल झाला

✦✦✦

त्याच्यामुळे

ईश्वर काही द्यायला बसलेलाच नाही
तो सगळं हिसकावून घ्यायला बसलाय

रिक्तता
शून्यता
स्तब्धता

तू जोपर्यंत खाली होत नाहीस
तोवर तो खुला होणार नाही

तेव्हा
ह्या सगळ्या, नवसांच्या, मागण्यांच्या, मन्नतीच्या
गुंतवळणीतून मोकळा हो
तिची जट होण्याची वाट पाहू नकोस

ह्या दु:खाच्या गाठी
हे वेदनांचे फोड
हे पश्चातापाचे डाग
हे सर्वच तुझ्यात ईश्वर नसल्याचे द्योतक आहे

तुझे डोळे झाडासारखे वाळत चाललेत
जीभेत जळतोय भाषेचा पाचोळा
कानांत कुजतोय खोट्या दिलाशांचा मळ

फक्त हा एक श्वासच आहे
ज्याला अद्याप काहीच नाही झालेले

कदाचित तोच आहे
ईश्वरापर्यंत पोहोचण्याची शेवटची शक्यता

त्याच्यामुळेच ही जगण्याची विष्ठा सुगंधित आहे

✦✦✦

नदी

नदीला माहीत नाही
तिच्या डाव्या बाजूला काठ आहे
उजव्या बाजूला काठ

तिला फक्त वाहणं माहीत आहे
आणि ती वाहतीये

तिला माहीत नाही
तिच्या वाहण्यातून पीकं फुलताहेत, आयुष्य फुलताहेत
संस्कृत्या फुलताहेत

तिला हेही माहीत नाही
की तिच्यामुळे
माणसांच्या आयुष्यात
ऐलतीर
पैलतीर
अशा भानगडी आहेत

ती फक्त वाहतीये

खरंतर तिला ती वाहतीये
हेही माहीत नाही

कदाचित ती ‘आहे’ हेही

✦✦✦

माणुसकी

मित्रा
माणुसकी खोलवर जप काळजात
न्हे तिला झिरपवत तुझ्या जनुकात

तूच कदाचित वाचलेला शेवटचा पुरुष ठरलास
तर ती तुझ्या वंशात
संक्रमित झाली पाहिजे.

✦✦✦

यमासाठी

तू रेड्यावरून येतोस
हे काही बरं नाही

तू घोड्यावरून आला असतास
तर ते तुला शोभलं असतं

खैर
आता तुझ्याच पाठीमागं बसून जायाचं म्हटल्यावर
घोडा काय आणि रेडा काय

निघताना सगळ्यांना जरा फास्ट दिसेनासा झालो असतो एवढंच

✦✦✦

रजनीश : स्वगत

जे मूळात अडकले होते
त्याच्यांशी खोडकरपणे खोडावर बोलत राहिलो

जे खोडात अडकले होते
त्यांच्याशी फांदेबाजासारखा फांद्यावर बोलत राहिलो

जे फांद्यात अडकले होते
त्याच्याशी प्रफुल्ल होऊन फुलावर बोलत राहिलो

आणि जे फुलात फुल्टू होते
त्यांच्याशी कशावरच बोललो नाही

फक्त त्यांचा मदमस्त सुवास उडवत जाणाऱ्या
टंच झुळकीची वाट पाहत
नाकात उंच टाचेने उभा राहिलो

✦✦✦

सवय

माणसाला प्रथम जगण्याची सवय झाली

मग हळूहळू जगण्यासाठी दुसऱ्यांना मारण्याची सवय झाली

आता ऐकतोय की
काही माणसे आत्महत्या करतायत

माणसाला हळूहळू तिचीही सवय लागली तर...

✦✦✦

एक अनेक मेख

एक होतो
पाहिले
अनेक झालो

नेक होतो
वाहिले
फेक झालो

आई होतो
प्रसविले
लेक झालो

कॅश होतो
सही केली
चेक झालो

ज्ञान होतो
ज्ञानलो
मेख झालो

✦✦✦